लोकमत
र, शुक्रवार, दि. १ ऑगस्ट २०२५

# इचलकरंजीत एमबीबीएस कॉलेजसाठी डीकेटीईने मागितली परवानगी

**इचलकरंजी** : शहरामध्ये एमबीबीएस कॉलेज सुरू करण्यासंदर्भात शासनाकडे अर्ज दाखल करण्यात आला आहे. त्याचा मुलांना चांगला उपयोग होईल, अशी माहिती माजी आमदार प्रकाश आवाडे यांनी दत्ताजीराव कदम लॉ कॉलेजच्या उद्घाटनप्रसंगी आयोजित कार्यक्रमात बोलताना दिली.

आवाडे म्हणाले, शिक्षणामध्ये मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे. अनेक नवनवीन तंत्रज्ञान येत आहे. ते ओळखून शहरामध्ये विविध तांत्रिक महाविद्यालये सुरू झाली आहेत.

सांगली व कोल्हापूर येथून विद्यार्थी इचलकरंजी शहरामध्ये शिक्षणासाठी येत आहेत. शैक्षणिक सुविधा देणारे हब म्हणून शहराची ओळख होत आहे. आयजीजीएच रुग्णालयात नर्सिंग कॉलेज मंजूर झाले आहे. एमबीबीएस मेडिकल कॉलेज काढण्याची परवानगी आम्ही शासनाकडे मागितली आहे.

01/08/2025

केसरी
शुक्रवार, १ ऑगस्ट २०२५



इचलकरंजी : उद्घाटन प्रसंगी माजी मंत्री प्रकाश आवाडे, माजी खासदार निवेदिता माने, अभयकुमार साळुंखे व इतर.

# इचलकरंजीत दत्ताजीराव कदम लॉ कॉलेजचे उद्घाटन

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी** : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या दत्ताजीराव कदम लॉ कॉलेज या शहरातील पहिल्या विधी महाविद्यालयाचे उद्घाटन उत्साहात पार पडले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली, माजी मंत्री प्रकाश आवाडे व माजी खासदार निवेदिता माने यांच्या प्रमुख उपस्थितीत समारंभ झाला.

यावेळी संस्थेचे सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, रामकृष्ण तोष्णीवाल, विवेक घाटगे, श्रीराम साळुंखे आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. अतिष पाटील यांनी केले. आभार प्राचार्या शुभांगी गावडे यांनी मानले.

01/08/2025

1/8/25

लोकमत
र, शनिवार, दि. २ ऑगस्ट २०२५

# तरुणांना योग्य दिशा न दिल्यास क्रांती

## प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**इचलकरंजी :** शिक्षणाकडे गांभीर्याने बघण्याची गरज आहे. फक्त मतांकडे लक्ष देऊन तरुण पिढी बाद करणार आहात का? या तरुण पिढीला दिशा दिली नाही, तर तो क्रांती केल्याशिवाय राहणार नाही. खासदार आणि आमदारांना फिरणेही अवघड होईल. याचाही विचार करणे गरजेचे आहे, असे परखड मत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे यांनी व्यक्त केले.

दत्ताजीराव कदम लॉ कॉलेजचे उद्घाटन साळुंखे, माजी आमदार प्रकाश आवाडे, संस्थेच्या सचिव शुभांगी गावडे यांच्या हस्ते झाले.



इचलकरंजीत बुधवारी दत्ताजीराव कदम लॉ कॉलेजचे उद्घाटन अभयकुमार साळुंखे, माजी आमदार प्रकाश आवाडे, शुभांगी गावडे आदींच्या उपस्थितीत झाले.

त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. आवाडे म्हणाले, कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी कोल्हापूर व सांगलीला विद्यार्थी जात होते. त्यांना शहरातच महाविद्यालये उपलब्ध झाली आहेत. त्याचा नक्की फायदा होईल.

यावेळी माजी खासदार निवेदिता माने, श्रीराम साळुंखे, आदींची भाषणे झाली. संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, डॉ. मिलिंद हुजरे, ॲड. विवेक घाडगे, प्राचार्य डॉ. एस.के.खाडे, आदी उपस्थित होते.

02/08/25

02/08/25

सकाळ, शनिवार, २ ऑगस्ट २०२५

॥ ज्ञान,विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार ॥

## श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

BAR COUNCIL OF INDIA, NEW DELHI AND SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR AFFILIATED

# दत्ताजीराव कदम लॉ कॉलेज, इचलकरंजी

सर्वे न. २७४३६, ओल्ड कोल्हापूर नाका, शिवाजीनगर, छ.शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी - ४१६ ११



## ADMISSION OPEN

- बार कौन्सिल ऑफ इंडिया नवी दिल्ली यांची मान्यता.
- शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांची संलग्नता.
- महाराष्ट्रातील सर्वात मोठी व अग्रगण्य शिक्षण संस्था.
- अनुभवी प्राध्यापक वृंद.
- प्रशस्त बिल्डिंग, प्रशस्त प्रांगण, प्रशस्त मैदान.
- शासनाच्या सर्व शिष्यवृत्ती लागू.
- सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सर्व परिसर सीसीटीव्ही ने संरक्षित.
- स्पोर्ट्स ॲक्टिव्हिटी उपलब्ध.
- कॉलेजच्या मुख्य प्रवेशद्वारालगत कोल्हापूर - इचलकरंजी बस स्टॉप ची सोय.
- मध्यवर्ती बस स्थानक १ कि.मी. अंतरावर.
- सुसज्ज ग्रंथालय वाचनालयाचे सुविधा.
- पुस्तकांचे देवघेव सुविधा, संगणक लॅब.

### अभ्यासक्रम

**L.L.B - 3 YEAR**
प्रवेश क्षमता ६०
पात्रता - कोणतेही पदवी

**B.A. L.L.B - 5 YEAR**
प्रवेश क्षमता ६०
पात्रता - १२ वी किंवा समतुल्य

9420931543 | 9975105585 | 9356353411

Arshad
02/08/25

पुढारी | ४
सोमवार । ४ ऑगस्ट २०२५

## प्रेमचंद यांचे साहित्य लोकशाही मूल्यांचा झरा : डॉ. मुंज

इचलकरंजी : प्रेमचंद यांचे साहित्य म्हणजे समाजातील शोषित, वंचित आणि दुर्बल घटकांचा आवाज आहे. आजही त्यांच्या लेखनातून लोकशाही मूल्ये, सामाजिक समता आणि मानवतावादी दृष्टिकोन यांचे प्रभावी मार्गदर्शन मिळते, असे मत शिवाजी विद्यापीठातील हिंदीचे प्राध्यापक डॉ. प्रकाश मुंज यांनी व्यक्त केले. येथील डीकेएएससी कॉलेज आणि आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने प्रेमचंद जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. डॉ. मुंज यांनी प्रेमचंदांच्या कथा व कादंबऱ्यांमधील वास्तवदर्शी पात्रांचे मनोज्ञ विश्लेषण करताना सांगितले की, ईदगाह, पंच परमेश्वर, सद्गतीफ पूस की रात, कफन, गोदान अशा कथांमधून सामाजिक अन्यायाविरुद्धचा संघर्ष, जातीपात आणि वर्गभेदावरचा प्रहार, तसेच करुणा आणि सहवेदनेचा प्रत्यय येतो. अध्यक्षस्थानी प्रा. डी. ए. यादव होते. प्रा. नीलेश जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रा. किशोरी टोणपे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अपर्णा कांवळे यांनी आभार मानले.

04/07/2025

04/07/25

सकाळ सोमवार, ४ ऑगस्ट २०२५



इचलकरंजी : प्रेमचंद जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात डॉ. प्रकाश मुंज यांचा सत्कार उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव यांच्या हस्ते करण्यात आला.

# डीकेएएससी कॉलेजमध्ये प्रेमचंद जयंती साजरी

**इचलकरंजी :** प्रेमचंद यांचे साहित्य म्हणजे समाजातील शोषित, वंचित आणि दुर्बल घटकांचा आवाज आहे. आजही त्यांच्या लेखनातून लोकशाही मूल्ये, सामाजिक समता आणि मानवतावादी दृष्टिकोन यांचे प्रभावी मार्गदर्शन मिळते, असे मत शिवाजी विद्यापीठातील हिंदीचे प्रा. डॉ. प्रकाश मुंज यांनी व्यक्त केले. येथील डीकेएएससी कॉलेज आणि आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने प्रेमचंद जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव होते. प्रा. नीलेश जाधव यांनी प्रास्ताविक केली. प्रा. किशोरी टोणपे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अपर्णा कांबळे यांनी आभार मानले. डॉ. विठ्ठल नाईक, डॉ. अंजली उबाळे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांचे मार्गदर्शन लाभले.

04/07/2025

04/07/25

पुढारी

शुक्रवार, ८ ऑगस्ट २०२५

# डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनी आज विविध कार्यक्रमांचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा ३८ वा स्मृतिदिन शुक्रवारी (दि.८) सकाळी १०.३० वाजता स्मृतिभवन येथे होणार आहे. समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर उपस्थित राहणार आहेत.

अविनाश भारती 'आजची संस्कृती व डॉ. बापूजी साळुंखे यांची विचारधारा' या विषयावर व्याख्यान होणार आहे. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम होणार आहे. यावेळी संस्था सेक्रेटरी प्राचार्य शुभांगी गावडे, संस्थेचे सहसचिव (प्रशासन) एस. एम. गवळी, संस्थेचे सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी संस्थेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

08/08/25

पुण्य नगरी
शुक्रवार, ८ ऑगस्ट २०२५

# शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे : ज्ञानयोगी, कर्मयोगी

**शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा ८ ऑगस्ट २०२५ रोजी स्मृतिदिन आहे. या निमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला थोडक्यात आढावा.**

समाजातील बहुजनांच्या शिक्षणासाठी आयुष्य खर्ची घालणारे महाराष्ट्राच्या १२ जिल्ह्यांत व कर्नाटकातील एका जिल्ह्यात ज्ञानगंगा घरोघरी पोहोचविणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणजे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे. त्यांचा जन्म दि. ९ जून, १९१९ रोजी सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील रामापूर या छोट्या गावात झाला. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गुरुदेव कार्यकर्त्यांच्या साथीने महाराष्ट्राच्या उस्मानाबाद, पुणे, सातारा, रायगड, कोल्हापूर, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पेण, बेळगाव अशा जिल्ह्यांमध्ये ज्ञानमंदिरे उघडून येथील जनतेच्या शिक्षणाची सोय केली.

'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार' या ध्येयवादाने प्रेरित होऊन त्यांनी १९५४ मध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. शिक्षणाने माणूस ज्ञानी व सुसंस्कारी



व्हावा, यासाठीच त्यांनी शिक्षण प्रसाराचे सतीचे वाण हाती घेतले. खेड्यामध्ये, वाड्या-वस्त्या व आदिवासी पाड्यामध्ये जाऊन लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. आज या संस्थेची ४०७ शैक्षणिक संकुले शाळा, महाविद्यालये बालवाडी ते पदव्युत्तर शिक्षण दहा हजार गुरुदेव कार्यकर्त्यांच्या साथीने भारताची तरुण पिढी आत्मविश्वासाने घडवत आहेत. बापूजींच्या शैक्षणिक कार्यात त्यांच्या पत्नी संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांचे योगदान मोठे आहे. त्यांच्या भक्कम पाठिंब्यामुळेच बापूजी तेरा जिल्ह्यांत संस्कार केंद्रे उभी करू शकले. ग्रामीण भागात राहणाऱ्या समाजातील वंचित घटकांपर्यंत शिक्षणाची गंगोत्री पोहोचविण्याच्या केलेल्या कार्यामुळे शासन व विविध संस्था यांनी बापूजींना मानपत्र दिले. बापूजींच्या पवित्र स्मृतीस कोटी कोटी प्रणाम.

- हितेंद्र साळुंखे, सहायक ग्रंथपाल,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

08/08/25

केसरी
८ ऑगस्ट २०२५/१०



# सस्नेह निमंत्रण

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार ॥

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



## श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

## शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा ३८ वा स्मृतिदिन

• कार्यक्रमाचे अध्यक्ष •

**मा. प्राचार्य अभयकुमारजी साळुंखे**

• प्रमुख पाहुणे •

**मा. ना. पंकज भोयर साहेब**

(राज्यमंत्री, शालेय शिक्षण, गृह (ग्रामीण), सहकार, खनिकर्म, गृहनिर्माण)

• प्रमुख वक्ते •

**श्री. अविनाश भारती**

(सुप्रसिद्ध कवी व व्याख्याते)

• विषय •

**आजची संस्कृती व डॉ. बापूजी साळुंखे यांची विचारधारा**

या प्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके वितरीत केली जाणार आहेत.

कार्यक्रम वेळ : शुक्रवार, दिनांक ८ ऑगस्ट, सकाळी १०.३० वाजता

निमंत्रक : **प्राचार्य सौ. शुभांगी गावडे**

(सचिव, श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर)

**कार्यक्रम स्थळ : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन, ताराबाई पार्क, कोल्हापूर**

08/08/25

लोकमत
शनिवार, दि. ९ ऑगस्ट २०२५



शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३८ व्या स्मृतिदिन निमित्त आयोजित कार्यक्रमात शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# महाराष्ट्राच्या जडणघडणीत बापूजी साळुंखे यांचे मोलाचे योगदान

## पंकज भोयर : ३८ व्या स्मृतिदिननिमित्त कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था ही महाराष्ट्रातील नावलौकिक असलेली संस्था असून, त्यांच्यामुळे डोंगरदऱ्यातील बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहोचले. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे योगदान मोलाचे आहे, असे प्रतिपादन शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी केले.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३८ व्या स्मृतिदिनानिमित्त शुक्रवारी आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार अध्यक्षस्थानी होते.

राज्यमंत्री भोयर पुढे म्हणाले, डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्रातील १२ जिल्हे आणि बेळगावसह एकूण १४ जिल्ह्यांत शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार केला. त्यांनी निर्माण केलेल्या संकुलांमधून त्यांचा द्रष्टेपणा दिसतो. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी स्वागत केले. डॉ. कविता तिवडे, प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सीताराम गवळी यांनी आभार मानले. यावेळी सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, उपाध्यक्ष अविनाश पाटील, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, विभाग प्रमुख श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार आदी उपस्थित होते. (वा.प्र.)

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
९ ऑगस्ट २०२५/५

# शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा ३८ वा स्मृतिदिन उत्साहात साजरा

केसरी वृत्तसेवा

तासगाव: श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक आणि ग्रामीण भागातील शिक्षणक्रांतीचे प्रणेते शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा ३८ वा स्मृतिदिन स्वामी रामानंद भारती विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज, तासगाव येथे अत्यंत उत्साहात आणि भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमात उपस्थित प्रमुख पाहुणे बेडगे सर, प्राचार्य प्रकाश हाके व इतर मान्यवर.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. उपस्थितांनी संस्थेचे प्रार्थनागीत सामूहिकरित्या सादर करून त्यांना आदरांजली अर्पण केली. यावेळी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील सर्व गुरुदेव कार्यकर्ते, विद्यार्थी-विद्यार्थिनी, तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. बापूजींच्या स्मृतिदिनानिमित्त चित्रकला स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना रोख रक्कम, प्रमाणपत्र व गुलाबपुष्प देऊन विशेष सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आणि संस्थेचे आजीव सेवक श्री. बेडगे सर यांनी बापूजींच्या जीवनकार्यावर भाष्य करताना सांगितले की, बापूजींनी ग्रामीण भागात शिक्षणाची ज्योत प्रज्वलित केली. त्यांनी गोरगरिबांच्या मुलांसाठी शिक्षणाचे दरवाजे खुले केले. शिक्षण हेच खरे समाजपरिवर्तनाचे साधन आहे असा त्यांचा दृढ विश्वास होता.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर येथील सांगली जिल्हा विभागप्रमुख व आजीव सेवक प्राचार्य पी. एल. हाके यांनी बापूजींच्या कार्याचा सविस्तर परिचय करून दिला. विद्यार्थ्यांनी डॉ. बापूजींच्या जीवनावर आधारित प्रेरणादायी भाषणे सादर केली. यानंतर डॉ. बापूजी व स्वामी विवेकानंद यांच्या चित्ररथासह तासगाव शहरातून प्रबोधन फेरी काढण्यात आली. सूत्रसंचालन व आभार एस. के. किणीकर यांनी मानले.

LIBRARY

केसरी ९ ऑगस्ट २०२५/९



मिरज : शि. म. डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालयात डॉ. बापूजी साळुंखे यांना पुण्यस्मरणानिमित्त अभिवादन करताना मान्यवर.

# डॉ. बापूजी साळुंखे महाराष्ट्राला लाभलेले अनमोल रत्न

**प्रा. डॉ. अनिल पाटील**
केसरी वृत्तसेवा

मिरज : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक, संस्थापक आणि संवर्धक असणारे डॉ. बापूजी साळुंखे हे महाराष्ट्राला लाभलेले एक अनमोल रत्न आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. अनिल पाटील यांनी केले.

शि. म. डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज येथे काल डॉ. बापूजी साळुंखे यांचे ३८ वे पुण्यस्मरण साजरे करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

ते म्हणाले, की दलित मित्र असणाऱ्या बापूजींनी शैक्षणिक क्रांती घडवली. त्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक योगदानाचा वारसा आपणा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. शिक्षण हाच समाज प्रबोधनाचा खरा मार्ग आहे या विचाराने प्रेरित होऊन बापूजींनी आपले संपूर्ण आयुष्य समाज उन्नतीसाठी वेचले. ते शिक्षण क्षेत्रातील एक तेजस्वी तारा होते. त्यांच्या कार्यामुळे ग्रामीण भागातील गरजू व वंचित घटकांपर्यंत शिक्षणाचा प्रसार झाला.

यावेळेस ज्युनिअर स्टाफ, सीनियर स्टाफ, नॉन टीचिंग स्टाफ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

DATTAJIRAO KADAM A. S. C. COLLEGE ICHALKARANJI LIBRARY

तरुण भारत शनिवार ९ ऑगस्ट २०२५

# डॉ. साळुंखेंचे महाराष्ट्राच्या जडण-घडणीत योगदान

- राज्य शिक्षणमंत्री पंकज भोयर यांचे प्रतिपादन
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातील नावलौकिक असलेली शिक्षण संस्था आहे. महाराष्ट्राच्या डोंगरदऱ्यातील बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहोचले. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे योगदान मोलाचे आहे, असे प्रतिपादन राज्य शिक्षणमंत्री पंकज भोयर यांनी केले.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३८ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना राज्य शिक्षणमंत्री पंकज भोयर, सोबत शुभांगी गावडे, अभयकुमार साळुंखे, अविनाश भारती, कौस्तुभ गावडे, डॉ. आर. आर. कुंभार आदी.

भोयर म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्रातील १२ जिल्हे आणि बेळगावसह १४ जिल्ह्यात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार केला. त्यामुळे बापूजींचे द्रष्टेपण त्यांनी खेडोपाड्यात निर्माण केलेल्या संकुलांमधून दिसते. कवी व व्याख्याते अविनाश भारती म्हणाले, बापूजींनी सांगितलेला ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार या ध्येयवादाचे आचरण केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी शिक्षकांवर विश्वास ठेवावा आणि शिक्षकांनी तो विश्वास सार्थ करावा. तरच सुजाण नागरिक घडतील. बापूजींची प्रार्थना, शैक्षणिक विचार आणि तत्वज्ञानामधील मार्गदर्शक तत्वांचा संदर्भ नव्या शैक्षणिक धोरणात आहे. बापूजींच्या सत्य, शील, प्रामाणिकता, त्याग, पिळवणुकीस आळा या पंचसूत्रीचा अवलंब केला पाहिजे.

अध्यक्षस्थानावरून प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी बहुजन समाजाला शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची उभारणी केली. संस्थेतील गुणवंत विद्यार्थी व शाळा सिध्दी मूल्यमापन अंतर्गत विजेते म्हणून प्रथम क्रमांक विवेकानंद कॉलेज, द्वितीय क्रमांक जतमधील राजे रामराव महाविद्यालय, तृतीय क्रमांक तासगावातील पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाल येथील कलाशिक्षक विजयकुमार शिंगण यांनी शिवराज्याभिषेक रांगोळी काढून लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद केल्याबद्दल त्यांचा सत्कार केला.

संस्थेच्या कला शिक्षकांच्या कलाकृतींच्या प्रदर्शनाचे उद्घाटन केले. स्वागत, प्रास्ताविक संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी केले. आभार संस्थेचे सहसचिव (प्रशासन) सीताराम गवळी यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. कविता तिवडे, प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले. यावेळी संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, उपाध्यक्ष अविनाश पाटील, सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, संस्थेचे कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आदी उपस्थित होते.

NKK/MSJ

शनिवार, ९ ऑगस्ट २०२५ पुढारी

# समाज घडविण्याची शिक्षकांवर मोठी जबाबदारी

## शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर; शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा स्मृतिदिन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्यामुळेच महाराष्ट्राच्या डोंगरदऱ्यातील बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहोचले. विद्यार्थ्यांना बहुज्ञानशाखीय शिक्षणाला सामोरे जावे लागणार आहे. या अस्वस्थ वर्तमानाच्या काळात बापूजींच्या विचारांचे स्मरण व अंगीकार करायला हवा. बापूजींना अभिप्रेत असणारा शिक्षकच चांगला समाज घडवू शकतो, असे प्रतिपादन शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी केले.



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर. समवेत प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कौस्तुभ गावडे आदी.

(छाया : नाज ट्रेनर)

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. याप्रसंगी कवी अविनाश भारती यांचे 'आजची संस्कृती व डॉ. बापूजी साळुंखे यांची विचारधारा' या विषयावर व्याख्यान झाले. ते म्हणाले, ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार हा ध्येयवाद सर्वांनी आचरणात आणून विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत योगदान द्यावे. विद्यार्थ्यांनी शिक्षकांवर विश्वास ठेवावा आणि शिक्षकांनी तो विश्वास सार्थ करावा, तरच, येणाऱ्या काळात सुजाण नागरिक घडतील.

अध्यक्षीय मनोगतात संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य साळुंखे म्हणाले, डॉ. बापूजी साळुंखे यांनी शिक्षणातील संधी व आव्हाने ओळखून शिक्षण क्षेत्रात अव्याहत कार्य केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविताना शिक्षकांनी सजग असणे गरजेचे आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून त्यावर स्वार होण्याचे आव्हान शिक्षकांनी स्वीकारले पाहिजे. याप्रसंगी संस्थेतील गुणवंत विद्यार्थी व शाळा सिद्धी मूल्यमापन अंतर्गत विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी प्रास्ताविक केले. संस्थेचे सहसचिव (प्रशासन) सीताराम गवळी यांनी आभार मानले. डॉ. कविता तिवडे, प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे उपाध्यक्ष अविनाश पाटील, संस्थेचे सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, संस्थेचे कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

09/08/25

09/08/25

तरुण भारत सोमवार दि. ११ ऑगस्ट २०२५

थोडक्यात महत्त्वाचे



# डीकेएएससी महाविद्यालयात एनसीसी विभागातर्फे रक्षाबंधन

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयात एनसीसी विभागाच्या वतीने रक्षाबंधन सोहळ्याचे आयोजन केले होते. यावेळी एनसीसी कॅडेट मुलींनी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे, मान्यवर, एनसीसी कॅडेट यांना राखी बांधून, औक्षण करून रक्षाबंधन साजरा केला. महाविद्यालयात असे उपक्रम साजरे केल्याने विद्यार्थ्यांमध्ये बंधुत्वाची भावना कायम राहते. त्यामुळे असे उपक्रम नेहमी राबवले पाहिजेत ही आनंदाची बाब आहे, अशा भावना प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी व्यक्त केल्या. यावेळी प्रा. डी. ए. यादव, प्रबंधक आर. बी. जोग यांची विशेष उपस्थिती होती. एनसीसी प्रमुख लेफ्टनंट प्रा. विनायक भोई यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रा. रोहित शिंगे यांनी प्रास्ताविक केले. लेफ्टनंट प्रा. विनायक भोई यांनी आभार मानले. यावेळी एनसीसी कॅडेट, विद्यार्थी उपस्थित होते.

11/08/25

11/08/25

सकाळ सोमवार, ११ ऑगस्ट २०२५



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात एनसीसी विभागात रक्षाबंधन कार्यक्रम झाला.

## डीकेएएससी महाविद्यालयात रक्षाबंधन

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी महाविद्यालयात एनसीसी विभागातर्फे रक्षाबंधन साजरी केली. एनसीसी कॅडेट मुलींनी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्यासह उपस्थित एनसीसी कॅडेटना राखी बांधून आणि औक्षण करून रक्षाबंधन साजरा केला. सण साजरे केल्याने विद्यार्थ्यांमध्ये बंधुत्वाची भावना कायम राहते, ही आनंदाची बाब आहे, अशा भावना प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी व्यक्त केल्या. प्रा. डी. ए. यादव, प्रबंधक आर. बी. जोग यांची उपस्थिती होती. एनसीसी विभाग प्रमुख लेफ्टनंट प्रा. विनायक भोई यांनी नियोजन केले. प्रा. रोहित शिंगे यांनी प्रास्ताविक केले.

11/08/25

11/08/25

केसरी १३ सप्टेंबर २०२५



इचलकरंजी : यशस्वी खेळाडूंना शुभेच्छा देताना प्राचार्य एस. के. खाडे व विनायक भोई.

# डी.के.ए.एस.सी.च्या खेळाडूंचे तायक्वांदो, जलतरण स्पर्धेत यश

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कोल्हापूर आणि इचलकरंजी महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शासकीय तायक्वांदो व जलतरण स्पर्धा राजीव गांधी भवन व शंकरराव पुजारी जलतरण तलाव येथे पार पडल्या. या स्पर्धेत डी.के.ए.एस.सी. महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन केले. जलतरण स्पर्धेत सई शिंदे हिने ५० मीटर फ्री स्टाइल, ५० मीटर बॅक स्ट्रोक व १०० मीटर बॅक स्ट्रोक या तिन्ही प्रकारांत प्रथम क्रमांक पटकावला. तिची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तायक्वांदो प्रकारात हर्षदा पुजारी हिने ५२ ते ५६ किलो गटात प्रथम क्रमांक, तर ज्ञानदा पुजारी हिने ४८ ते ५२ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक मिळवून विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून समाधान व्यक्त केले. खेळाडूंना क्रीडा संचालक प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले आणि प्रबंधक श्री. आर. बी. जोग यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाचा प्राध्यापक व प्रशासकीय स्टाफ तसेच विद्यार्थी यांनी खेळाडूंना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

केसरी १३ सप्टेंबर २०२५

# डी. के. ए. एस. सी. कॉलेजमध्ये संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे जयंती



इचलकरंजी : वक्तृत्व स्पर्धेच्या उद्‌घाटन समारंभात बोलताना प्राचार्य डॉ. एस. के. खाडे. यावेळी उपस्थित गुरुदेव कार्यकर्ते.

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** डी. के. ए. एस. सी. कॉलेज इचलकरंजी येथे संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या ९८ व्या जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. ही स्पर्धा मंगळवार, दि. ९ सप्टेंबर रोजी वाङ्मय मंडळाच्या वतीने मोठ्या उत्साहात पार पडली. स्पर्धेचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या हस्ते झाले.

यावेळी प्राचार्य डॉ. खाडे यांनी सांगितले, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या एकूणच प्रवासात संस्थामातांचे योगदान अमूल्य आहे. संस्थेच्या निर्मितीपासून स्वतःच्या शेवटच्या श्वासापर्यंत संस्थेच्या प्रत्येक घटकावर मुलाप्रमाणे प्रेम करून संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांनी आपल्या मायेने ही संस्था जपली आणि वाढवली. त्यांच्या आठवणींची उजळणी व्हावी व त्यांच्याप्रती कृतज्ञ होता यावे म्हणून या स्पर्धेचे आयोजन आहे.

संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या जीवनकार्यावर मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीनही भाषांमध्ये विद्यार्थ्यांनी भाषणे सादर केली. स्पर्धेचे परीक्षण प्रा. निलेश जाधव व प्रा. संदीप पाटील यांनी केले.

संस्था प्रार्थना आणि प्रतिमापूजनाने सुरू झालेल्या उद्‌घाटन सत्राचे प्रास्ताविक वाङ्मय मंडळ समन्वयक प्रा. रोहित शिंगे यांनी केले. यावेळी दुपार सत्र प्रमुख प्रा. डी. ए. यादव, सकाळ सत्र प्रमुख प्रा. व्ही. पी. पाटील, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. पी. ए. पाटील, मराठी विभाग प्रमुख डॉ. सुभाष जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. आभार प्रा. अर्चना नंदगावे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. अंजली उबाळे यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा. अपर्णा कांबळे व प्रा. प्रथमेश गवळी यांच्यासह वाङ्मय मंडळातील सर्व सदस्य यांनी सहकार्य केले. यावेळी गुरुदेव कार्यकर्ते, प्राध्यापक तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

केसरी १३ सप्टेंबर २०२५/



बॅडमिंटन संघाचे अभिनंदन करताना प्राचार्य एस. के. खाडे.

# डीकेएएससी महाविद्यालयाच्या संघाची विभागीय बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कोल्हापूर व इचलकरंजी महानगरपालिका आयोजित शासकीय बॅडमिंटन स्पर्धा व्यंकटराव हायस्कूल येथे झाल्या. स्पर्धेमध्ये १९ वर्षांखालील गटामध्ये डीकेएएससी महाविद्यालयाच्या बॅडमिंटन संघाने उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद पटकावले. या संघाची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

या संघाने पहिल्या दोन सामन्यात अनुक्रमे व्यंकटराव ज्युनि. कॉलेज व डीकेटीई कॉलेज यांच्यावर विजय प्राप्त करत अंतिम सामन्यात प्रवेश केला. अंतिम सामन्यात तात्यासाहेब मुसळे कॉलेजचा सरळ २ गेममध्ये पराभव करून स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. संघातील खेळाडू अपूर्व दवडते, मोहित कांबळे, सुभान सनदी, प्रथमेश कोष्टी व आयुष बुचडे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

खेळाडूंचे प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी अभिनंदन केले. खेळाडूंना क्रीडा संचालक प्रा.विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत
मंगळवार १६ सप्टेंबर २०२५



# डीकेएएससी महाविद्यालयाचे जलतरण, तायक्वांदोमध्ये यश

**इचलकरंजी :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कोल्हापूर व इचलकरंजी महानगरपालिका आयोजित शासकीय तायक्वांदो व स्विमिंग स्पर्धेमध्ये सई शिंदे या खेळाडूने ५० मी फ्री स्टाईल, ५० मी. बॅक स्ट्रोक व १०० मी बॅक स्ट्रोक खेळ प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला व तिची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्याचप्रमाणे तायक्वांदो खेळामध्ये हर्षदा पुजारी ५२ ते ५६ वजन गटामध्ये प्रथम क्रमांक व ज्ञानदा पुजारी ४८ ते ५२ वजनी गटात प्रथम क्रमांक मिळवला व यांचीही विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी अभिनंदन केले. खेळाडूंना क्रीडा संचालक प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रबंधक आर. बी. जोग यांचे मार्गदर्शन लाभले.

Arkad
16/09/25

पुण्य नगरी ■ मंगळवार, १६ सप्टेंबर २०२५

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेज अव्वल

गडहिंग्लज : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विद्यार्थी विकास विभाग व शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालयामार्फत जिल्हास्तरीय युवा महोत्सवात सांघिक व वैयक्तिक स्पर्धा सर्वसाधारण विजेतेपद फिरता चषक विवेकानंद कॉलेज कोल्हापूरने पटकावला.

युवा महोत्सवात लोकनृत्य कला प्रकारात दत्ताजीराव कदम टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे टेक्स्टाईल अँड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट इचलकरंजी, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

लोककला- सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, डॉ. डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, शिवराज साहित्य वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज, डी. आर. माने आर्टस्, अँड कॉमर्स कॉलेज कागल.

एकांकिका- देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज कागल, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

प्रहसिका- देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय जयसिंगपूर, डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

मूकनाट्य- भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगुड, आण्णासाहेब डांगे आर्टस् कॉमर्स हातकणंगले, दत्ताजीराव कदम आर्टस् सायन्स अँड कॉमर्स कॉलेज इलकरंजी, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

पथनाट्य- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज कोल्हापूर, सदाशिवराव मंडलिक मुरगूड, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, विजयसिंह यादव कॉलेज पेठ वडगाव.




गडहिंग्लज : जिल्हास्तरीय युवा महोत्सवात कला सादर करताना विद्यार्थिनी.

भारतीय समूहगीत-विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कोल्हापूर, राजाराम कॉलेज कोल्हापूर.

वादविवाद- शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, के. आय. टी.चे कॉलेज ऑफ इंजि. कोल्हापूर, डॉ. घाळी कॉलेज गडहिंग्लज, दि न्यु कॉलेज कोल्हापूर, यशवंतराव चव्हाण हलकर्णी चंदगड.

प्रश्नमंजुषा- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, डी. वाय. पाटील कोल्हापूर, डी. डी. शिंदे सरकार कॉलेज कोल्हापूर, कॉलेज ऑफ नॉन-कन्व्हेन्सनल व्होकेशनल कोर्स फॉर वूमन कोल्हापूर, डॉ. घाळी कॉलेज गडहिंग्लज.

एकपात्री अभिनय- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, कॉलेज ऑफ नॉन-कनव्हेन्सनल व्होकेशनल कोर्स फॉर वूमन कोल्हापूर, आर्टस् कॉमर्स अँन्ड सायन्स महाविद्यालय गडहिंग्लज, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, दत्ताजीराव कदम इचलकरंजी.

सुगम गायन- देशभक्त रत्नाप्पा कुंभार कोल्हापूर, भोगावती महाविद्यालय कुरुकली, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, चंद्राबाई-शांताप्पा शेंडुरे कॉलेज हुपरी, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ.

वक्तृत्व मराठी- डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज कोल्हापूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, डॉ. घाळी कॉलेज गडहिंग्लज, शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज.

वक्तत्व हिंदी- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, जयवंत महाविद्यालय इचलकरंजी, दूधसागर महाविद्यालय बिद्री, डी. वाय. पाटील कॉलेज कोल्हापूर.

वक्तृत्व इंग्रजी- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, शिव-शाहू महाविद्यालय सरूड, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कोल्हापूर. विजेत्या प्रत्येक कला प्रकारातील पाच संघांची शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज मिरज येथे गुरुवार (दि. १८) होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांनी दिली आहे.

सकाळ, बुधवार, १७ सप्टेंबर २०२५

# मराठीचा अभ्यास करताना साहित्य नव्याने समजून घ्या

## प्रा. पाटणकर; डीकेएएससीमध्ये मराठी वाङ्मय मंडळ

इचलकरंजी, ता. १६ : साहित्य माणसाच्या आयुष्यात आनंद घेऊन येते, मराठी साहित्यात कोल्हापूर जिल्ह्यातील साहित्यिकांचे योगदान मोठे आहे, मराठी वाङ्मयाचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांनी बहुतांलातील या साहित्यिकांचे साहित्य नव्याने समजून घ्यावे, असे प्रतिपादन प्रा. सौरभ पाटणकर यांनी केले.

येथील डीकेएएससी कॉलेजमधील मराठी विभागातर्फे आयोजित मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन आणि 'शब्दसाधना' या भित्तीपत्रिकेचे उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. ते म्हणाले, साहित्यिकांनी मराठी साहित्य विश्वात कोल्हापूरचे नाव अजरामर केले आहे, कथा, कविता, कादंबरी, नाटक अशा सर्व साहित्य प्रकारात कोल्हापुरातील साहित्यिकांनी समृद्ध लेखन केले आहे. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे होते. यावेळी 'ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि साहित्यिक जयंत नारळीकर यांचे जीवन आणि साहित्य' यावर मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी यंदाची भित्तीपत्रिका प्रदर्शित केली.

प्राचार्य डॉ. खाडे यांनी मनोगत केले. मराठी विभागप्रमुख प्रो. डॉ. सुभाष जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रा. रोहित शिंगे आणि प्रा. भारती कोळेकर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. प्रा. कोळेकर यांनी सूत्रसंचालन केले. लक्ष्मी पाटील हिने आभार मानले.




इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये आयोजित कार्यक्रमात प्रा. सौरभ पाटणकर यांचे स्वागत प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी केले.

17/09/25

17/09/25

केसरी १७ सप्टेंबर २०२५

# मराठी साहित्यात कोल्हापूर जिल्ह्यातील साहित्यिकांचे मोठे योगदान

## प्रा. सौरभ पाटणकर : डीकेएएससीमध्ये मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी** : मराठी साहित्यात कोल्हापूर जिल्ह्यातील साहित्यिकांचे योगदान मोठे आहे, असे प्रतिपादन प्रा. सौरभ पाटणकर यांनी केले.

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी येथे आयोजित मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन आणि शब्दसाधना या भित्तीपत्रिकेचे उद्घाटन प्रमुख पाहुणे प्रा. सौरभ पाटणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी ते बोलत होते.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि साहित्यिक जयंत नारळीकर यांचे जीवन आणि साहित्य यावर मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी यंदाची भित्तीपत्रिका प्रदर्शित केली. यावेळी प्रा. सौरभ पाटणकर म्हणाले, साहित्य सामान्य माणसाच्या आयुष्यात आनंद घेऊन येते. मराठी साहित्यात कोल्हापूर जिल्ह्यातील साहित्यिकांचे योगदान मोठे आहे. आनंद यादव, एकनाथ रेंदाळकर, शंकर पाटील, राजन गवस, कृष्णात खोत, आप्पासाहेब खोत यांसह अनेक साहित्यिकांनी मराठी साहित्य विश्वात कोल्हापूरचे नाव अजरामर केले आहे. कथा, कविता, कादंबरी, नाटक अशा सर्व साहित्य प्रकारात कोल्हापुरातील साहित्यिकांनी समृद्ध लेखन केले आहे. मराठी वाङ्मयाचा अभ्यास करत असताना विद्यार्थ्यांनी आपल्या भोवतालातील या साहित्यिकांचे साहित्य नव्याने समजून घ्यायला हवे.




इचलकरंजी : मार्गदर्शन करताना प्रा. सौरभ पाटणकर.

अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. के. खाडे म्हणाले, सध्याच्या डिजिटल युगात तंत्रज्ञानाच्या आहारी गेलेली पिढी पुस्तकांच्या पानांपासून दुरावलेली आहे की काय ही भीती हळूहळू खखरी ठरत आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी अभ्यास करत करत साहित्याचे अफाट दालन जे ग्रंथालयांमधून खुणावत असते त्या पुस्तकांच्या सानिध्यात राहायला हवे.

प्रास्ताविक डॉ. सुभाष जाधव यांनी केले. प्रा. रोहित शिंगे आणि प्रा. भारती कोळेकर यांनी संयोजन केले. सूत्रसंचालन प्रा. भारती कोळेकर यांनी, तर आभार लक्ष्मी पाटील हीने मानले.

17/09/25

17/09/25

सकाळ शुक्रवार, १९ सप्टेंबर २०२५

# 'डीकेएएससी'च्या खेळाडूंचे यश

इचलकरंजी, ता. १८ : जिल्हास्तरीय शासकीय तायक्वाँदो व स्विमिंग स्पर्धा राजीव गांधी भवन व शंकरराव पुजारी जलतरण तलाव येथे झाल्या. स्पर्धेत येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या सई शिंदे हिने ५० मी. फ्रीस्टाइल, ५० मी. बॅक स्ट्रोक व १०० मी. बॅक स्ट्रोक प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. तिची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच तायक्वाँदोमध्ये हर्षदा पुजारीने ५२ ते ५६ वजन गटात प्रथम क्रमांक व ज्ञानदा पुजारीने ४८ ते ५२ वजनी गटात प्रथम क्रमांक मिळवला.

दोघींचीही विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. खेळाडूंच्या यशाबद्दल प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी अभिनंदन केले. खेळाडूंना क्रीडा संचालक प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रबंधक आर. बी. जोग यांचे मार्गदर्शन लाभले.

19/09/25

19/09/25

केसरी
१९ सप्टेंबर २०२५/



इचलकरंजी : मल्लखांब स्पर्धेतील यशस्वी खेळाडू.

# डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंची विभागीय मल्लखांब स्पर्धेसाठी निवड

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कोल्हापूर व इचलकरंजी महानगरपालिका आयोजित शासकीय मल्लखांब खेळाच्या स्पर्धा डीकेटीई इंग्लिश मीडियम स्कूल इचलकरंजी या ठिकाणी उत्साहात झाल्या. त्यांनी केलेल्या या कामगिरीमुळे या सर्व खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

या स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या मल्लखांब खेळाडूंनी अद्वितीय कसरती सादर केल्या. यामुळे श्रुती मांगलेकर द्वितीय, केतकी बोनगे तृती, अनुष्का चिरमुठे चतुर्थ क्रमांक व विद्या इक्कळी पाचवा क्रमांक प्राप्त केला.

या उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. खेळाडूंना क्रीडा संचालक प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले व प्रबंधक आर. बी. जोग यांचे मार्गदर्शन लाभले.

19/09/25

19/09/25

दै. सकाळ दि. 21/09/2025



# मध्यवर्ती युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेजची बाजी

## ‘द न्यू कॉलेज’, ‘मुधोजी’ची उपविजेतेपदावर मोहर; तरुणाईच्या जल्लोषाने रंगत

■ सकाळ वृत्तसेवा

**मिरज, ता. २० : हलगीचा कडकडाट... निकाल जाहीर होईल तसा नाचतच येत चषक घेण्याची स्पर्धकांची घाई आणि नंतर गुलालाच्या उधळणीत तरुणाईने केलेल्या जल्लोषात येथे गेल्या तीन दिवसांपासून रंगलेल्या मध्यवर्ती युवा महोत्सवाची आज सांगता झाली. वैयक्तिक आणि सांघिक अशा दोन्ही प्रकारांत कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. वैयक्तिक प्रकारात दि न्यू कॉलेज, कोल्हापूरने, तर सांघिक प्रकारात फलटणच्या मुधोजी कॉलेजने उपविजेतेपदावर आपली मोहोर उमटवली.**

शिवाजी विद्यापीठाचा ४५ वा मध्यवर्ती युवा महोत्सव गेल्या तीन दिवसांपासून येथील शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालयात उत्साहात सुरू होता. आज शोभायात्रा आणि पारितोषिक वितरणाने सांगता झाली.

बळवंत कॉलेज, विटाने लोककला प्रकारात, लोकनृत्यात मुधोजी, नृत्यामध्ये 'बळवंत', 'मुधोजी', नाट्य, संगीतमध्ये 'विवेकानंद', कला सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, तर वाङ्मय प्रकारात राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, साखराळे यांनी फिरते गौरव चषक पटकावले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या प्रमुख उपस्थितीत विजेत्यांना चषक आणि सन्मानचिन्हाने गौरविण्यात आले.

कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्राचार्य साळुंखे यांनी मनोगतात महोत्सवाला मिळत असलेल्या प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त करत विद्यार्थ्यांचा वाढता सहभाग उल्लेखनीय असल्याचेही सांगितले.



मिरज : मध्यवर्ती युवा महोत्सवातील सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्याहस्ते कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजला शनिवारी प्रदान करण्यात आला

यावेळी आमदार इद्रीस नायकवडी, विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाचे डॉ. टी. एम. चौगुले, डॉ. सचिन चव्हाण यांच्यासह विद्यार्थिनी प्रज्ञा माळकर हिनेही मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. आर. डी. डमकले, एस. जी. परुळेकर, डॉ. एस. डी. जाधव, डॉ. देवानंद सोनटक्के, डॉ. आर. एच. अतिग्रे, सुरेखा आडके यांच्यासह सांगली, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांचे प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

### मध्यवर्ती युवा महोत्सव अंतिम निकाल

**कला प्रकार, प्रथम, द्वितीय, तृतीय पुढीलप्रमाणे :**

**वक्तृत्व मराठी :** शहाजी लॉ, गरवारे कन्या, सांगली, दि न्यू कॉलेज,
**वक्तृत्व हिंदी :** दूधसाखर, बिद्री, विवेकानंद, कर्मवीर, उरुण इस्लामपूर,
**वक्तृत्व इंग्रजी:** आरआयटी, साखराळे, देशभक्त रत्नाप्पा कुंभार, नाईक, शिराळा
**वादविवाद :** शहाजी लॉ, के.आय.टी., नाईक, शिराळा
**प्रश्नमंजूषा:** आरआयटी, साखराळे, विवेकानंद, सद्गुरू गाडगे महाराज, कऱ्हाड
**स्थळचित्र :** राजाराम , कोल्हापूर, नाईट कॉलेज, इचलकरंजी, नाईक, शिराळा
**व्यंगचित्र:** नाईक, शिराळा, राजाराम, कोल्हापूर, विवेकानंद
**भित्तिचित्र निर्मिती :** संजीवन, पन्हाळा, नाईक, शिराळा, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा
**कातरकाम:** सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, दत्ताजीराव कदम, इचलकरंजी, नाईक, शिराळा
**स्थळ छायाचित्रण:** डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग, कोल्हापूर, सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, दि. न्यू कॉलेज
**मातीकाम:** नाईट कॉलेज, इचलकरंजी, बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज, डी. पी. भोसले, कोरेगाव
**रांगोळी :** राजाराम, कोल्हापूर, विवेकानंद, नाईट कॉलेज, इचलकरंजी
**मेहंदी :** डेक्कन, कोल्हापूर, विलिंग्डन, सांगली, यशवंतराव, कोल्हापूर
**सांघिक रचनाकृती :** कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, कोल्हापूर, गव्हर्न्मेंट कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कऱ्हाड, संजीवन, पन्हाळा
**लघुपट:** मुधोजी, फलटण, सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, दि. न्यू कॉलेज
**एकल लोकवाद्यवादन :** नाईक, चिखली, सावित्रीबाई फुले महिला महा., सातारा, नाईट कॉलेज, इचलकरंजी
**नाट्य संगीत :** सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, विलिंग्डन, बापूजी साळुंखे, मिरज
**सुगम गायन:** आर्टस्, कॉमर्स अँण्ड सायन्स, पलूस, भोगावती, कुरुकली, शेंडूरे, हुपरी आणि विवेकानंद
**शास्त्रीय गायन:** शिवराज, गडहिंग्लज, विलिंग्डन, चिंतामणराव, सांगली
**शास्त्रीय सूरवाद्य:** डी.के.टी.ई इंजिनिअरिंग, इचलकरंजी, शिवराज, गडहिंग्लज, दत्ताजीराव कदम इचलकरंजी
**शास्त्रीय तालवाद्य :** महावीर, कोल्हापूर, दत्ताजीराव कदम, इचलकरंजी, नाईक, चिखली आणि मुधोजी
**पाश्चिमात्य एकल गायन:** शहाजी लॉ, विवेकानंद, पलूस
**पाश्चिमात्य एकल वादन:** विवेकानंद, रत्नाप्पा कुंभार, कोल्हापूर, सर्व अधिविभाग,
**पाश्चिमात्य समूहगीत:** विवेकानंद, पलूस, दत्ताजीराव कदम, इचलकरंजी
**भारतीय समूहगीत :** शहाजी लॉ, विवेकानंद, आरआयटी, साखराळे
**लोकसंगीत वाद्यवृंद :** बळवंत, विटा, डॉ. घाळी, गडहिंग्लज, नाईक, चिखली
**नकला :** घोडावत, जयसिंगपूर, मॉडर्न, मलकापूर, कऱ्हाड, सद्गुरू गाडगे महाराज, कऱ्हाड
**एकपात्री अभिनय:** विवेकानंद, कर्मवीर, सातारा, बापूजी, मिरज
**पथनाट्य:** कुसुमताई, उरुण-इस्लामपूर, सद्गुरू गाडगे महाराज, कऱ्हाड, विवेकानंद
**मूकनाट्य :** दत्ताजीराव कदम, इचलकरंजी, यशवंतराव चव्हाण, कऱ्हाड, भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,
**प्रहसिका:** रत्नाप्पा कुंभार, कोल्हापूर, सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, मुधोजी, फलटण, भारती विद्यापीठ, कोल्हापूर
**एकांकिका:** आर्टस् अँण्ड कॉमर्स, नागठाणे, कर्मवीर, सातारा, विवेकानंद
**उत्कृष्ट अभिनय स्त्री:** संयोगिता चौधरी, नागठाणे
**उत्कृष्ट अभिनय पुरुष:** मयुरेश बडवे, सांगली
**शास्त्रीय नृत्य:** दि. न्यू कॉलेज, विवेकानंद, गाडगे महाराज, कऱ्हाड
**लोकनृत्य:** मुधोजी, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग, नाईक, चिखली आणि नाईक, शिराळा, डी.के.टी.ई., इचलकरंजी
**लोककला:** बळवंत, सावित्रीबाई फुले, सातारा, यशवंतराव चव्हाण, उरुण-इस्लामपूर, गाडगे महाराज कॉलेज, कराड, सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ
**शोभायात्रा:** दत्ताजीराव कदम, इचलकरंजी, राजे रामराव, जत, दि. न्यू कॉलेज, कोल्हापूर

21/09/25

दक्षिण महाराष्ट्र केसरी १३ ऑगस्ट २०२५/६

# डीकेएएससी महाविद्यालयात रक्षाबंधन

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी** : येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयात एनसीसी विभागाच्यावतीने रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला. यावेळी एनसीसी कॅडेट मुलींनी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्यासह उपस्थित मान्यवर आणि एनसीसी कॅडेट यांना राखी बांधून आणि औक्षण करून रक्षाबंधन साजरा केला. भारतीय सण हे भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवत असतात. महाविद्यालयात असे उपक्रम साजरे केल्याने विद्यार्थ्यांमध्ये बंधुत्वाची भावना कायम राहते त्यामुळे असे उपक्रम नेहमी राबवले पाहिजेत अशा भावना व्यक्त करत प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी रक्षाबंधनच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रा. डी. ए. यादव, प्रबंधक आर. बी. जोग यांची उपस्थिती होती. एनसीसी विभाग प्रमुख लेफ्टनंट प्रा. विनायक भोई यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रा. रोहित शिंगे यांनी प्रास्ताविक केले. लेफ्टनंट प्रा. विनायक भोई यांनी आभार मानले.

13/08/25

शुक्रवार, १५ ऑगस्ट २०२५

तरुण भारत

# प्रबोधन वाचनालयास विद्यार्थ्यांची अभ्यास भेट

**इचलकरंजी :** भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.एस.आर. रंगनाथन यांची जयंती अर्थात भारतीय ग्रंथपाल दिनाचे औचित्य साधून समाजवादी प्रबोधिनीच्या प्रबोधन वाचनालयाला डीकेटीईएससी कॉलेजमधील बी.ए. व एम. ए. च्या मराठी विषयाच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी अभ्यास भेट दिली. प्राचार्य डॉ. एस. के. खांडे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुभाष जाधव, प्रा. रोहित शिंगे, प्रा. भारती कोळेकर यांनी विद्यार्थी, विद्यार्थिनींसह ही अभ्यास भेट दिली. यावेळी डॉ. सुभाष जाधव यांच्या हस्ते डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

18/08/25

18/08/25

केसरी १५ ऑगस्ट २०२५,



इचलकरंजी : डिकेएससी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी प्रबोधन वाचनालयास भेट दिली.

# प्रबोधन वाचनालयास ग्रंथपाल दिनी विद्यार्थ्यांची अभ्यास भेट

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.एस. आर. रंगनाथन यांची जयंती अर्थात भारतीय ग्रंथपाल दिनाचे औचित्य साधून समाजवादी प्रबोधिनीच्या प्रबोधन वाचनालयाला डी.के. ए.एस.सी कॉलेजमधील बी.ए. व एम.ए. च्या मराठी विषयाच्या विद्यार्थी - विद्यार्थिनीनी अभ्यास भेट दिली.

यावेळी डॉ. सुभाष जाधव यांच्याहस्ते डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रसाद कुलकर्णी यांनी स्वागत केले. सौदामिनी कुलकर्णी, नंदा हालभावी आणि कविता डांगरे यांनी ग्रंथालयीन कामकाजाची सविस्तर माहिती दिली. प्रा. रोहित शिंगे यांनी आभार मानले.

18/08/25

18/08/25

पुण्य नगरी ▮ बुधवार, २० ऑगस्ट २०२५

# डॉ. अतिश पाटील यांच्या संशोधनास पेटंट

**कुंभोज :** इचलकरंजी येथील डी.के.ए.एस.सी. कॉलेजमधील



भूगोलशास्त्र विभागातील डॉ. अतिश पाटील यांच्या संशोधनाची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेत त्यांच्या 'सरफेस माऊंटेड वॉटर हायड्रोड्रिफ्ट फिल्टरेशन डिव्हाईस' या अभिनव संकल्पनेला युनायटेड किंगडम सरकारकडून पेटंट मंजूर झाले आहे. ही नोंदणी बौद्धिक संपदा कार्यालय, यू.के. मार्फत अधिकृतपणे जाहीर झाली. त्यांना मिळालेले पेटंट महाविद्यालयातील मानव्यशास्त्र शाखेतून पहिलेच आहे. त्यांना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे, सहसचिव प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांचे प्रोत्साहन, तर डॉ. विनायक गानबावले, डॉ. सुनील भोसले, डॉ. अजिंक्य पत्रावळे यांचे सहकार्य लाभले.

तरुण भारत गुरूवार, २१ ऑगस्ट २०२५

# एल.एल.बी. प्रवेशासाठी दत्ताजीराव कदम लॉ कॉलेजतर्फे विशेष सुविधा

**इचलकरंजी :** महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी सेल) मार्फत एलएलबी ३ वर्षे व बी. ए. एलएलबी ५ वर्षे अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या फेरीसाठी पर्याय फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. पहिल्या आणि दुसऱ्या फेरीत प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी येथील दत्ताजीराव कदम लॉ कॉलेजने विशेष सुविधा उपलब्ध करून दिली आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. सी. एस. बागडी यांनी दिली.

बी.ए. एलएलबी ५ वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी पर्याय फॉर्म भरण्यासाठी २१ ते २४ ऑगस्टदरम्यान, तर एलएलबी ३ वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी २४ ते २७ ऑगस्टदरम्यान ही सुविधा विद्यार्थ्यांना मिळणार आहे. हे फॉर्म केवळ ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे असल्याने महाविद्यालयात इंटरनेट सुविधा, मार्गदर्शन करणारे प्राध्यापक तसेच सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत मदत केंद्र उपलब्ध असेल. पहिल्या व दुसऱ्या फेरीत प्रवेश न मिळालेल्या तसेच अद्याप कोणतीही प्रक्रिया न केलेल्या विद्यार्थ्यांनी ही संधी गमावू नये, तसेच इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाशी तातडीने संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

21/08/25

21/08/25

महासत्ता गुरुवार, ता.२१ ऑगस्ट २०२५

# दत्ताजीराव कदम लॉ कॉलेजच्या वतीने प्रवेश फॉर्म भरण्यासाठी विशेष सुविधा

इचलकरंजी,ता.२०–

महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी सेल) मार्फत एलएलबी ३ वर्षे आणि एलएलबी ५ वर्षे अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या फेरीसाठी पर्याय फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. ज्यांचे पहिल्या व दुसऱ्या प्रवेश फेरीत नाव आलेले नाही. त्यांच्यासाठी दत्ताजीराव कदम लॉ कॉलेज, इचलकरंजी यांच्यामार्फत फॉर्म भरण्याची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे अशी माहिती प्राचार्य डॉ. सी. एस. वागडी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिली आहे.

ज्या विद्यार्थ्यांना बी. ए. एलएलबी ५ वर्षे व एलएल. बी. ३ वर्षे पहिल्या व दुसऱ्या फेरीमध्ये प्रवेश मिळू शकलेला नाही. त्यांनी लवकरात लवकर आपले तिसऱ्या फेरीकरीता पर्याय फॉर्म भरणे आवश्यक आहे. हे फॉर्म केवळ ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे असल्याने सदर फॉर्म भरण्यासाठी दत्ताजीराव कदम लॉ कॉलेज च्यावतीने विशेष सुविधा बी. ए. एलएलबी ५ वर्षे करीता २१ ते २४ ऑगस्ट दरम्यान तसेच एलएल बी ३ वर्षेसाठी २४ ते २७ ऑगस्ट दरम्यान उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी महाविद्यालयात मार्गदर्शन करणारे प्राध्यापक व इंटरनेट सुविधा उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी कॉलेजमध्ये येऊन सकाळी १०ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत फॉर्म भरावेत. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप कोणतीही प्रक्रिया केलेली नाही त्यांनीही महाविद्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

21/08/25

21/08/25

तरुण भारत बुधवार २७ ऑगस्ट २०२५



इचलकरंजी : कंपनी सेक्रेटरी प्रवीण निगनुरे यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. एस. के. खाडे, समवेत सहकारी प्राध्यापक.

# डीकेएएससीमध्ये 'कंपनी सेक्रेटरी करिअरच्या वाटा'वर मार्गदर्शन

**इचलकरंजी :** येथील डी.के.ए.एस.सी. महाविद्यालयात कॉमर्स व बी. कॉम. आय.टी विभागात कंपनी सेक्रेटरी करिअरच्या वाटा या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कंपनी सेक्रेटरी प्रवीण निगनुरे यांनी विद्यार्थ्यांना कौशल्याधिष्ठीत शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगत करिअर निवडताना स्वावलंबन, लक्ष केंद्रीकरण व व्यावहारिक ज्ञान आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. कृत्रिम बुद्धिमत्ता व डेटा विश्लेषण यांसारखी कौशल्ये आत्मसात करून संधींचा शोध घ्यावा, असेही ते म्हणाले. सी. एस. संजीवनी नेमिष्टे यांनी विद्यार्थ्यांनी इच्छाशक्ती व गुणवत्तेच्या जोरावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण करता येते, तसेच कार्पोरेट क्षेत्रात विविध संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. दृकश्राव्याद्वारे सी. एस. अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती व फायदे यांचा आढावा घेण्यात आला. प्रास्ताविक प्रा. विजय पाटील यांनी केले. आभार प्रा. पूजा पारिशवाड यांनी मानले.

28/08/25

28/08/25

सकाळ, गुरुवार, २८ ऑगस्ट २०२५

# 'डीकेएएससी' कॉलेजमध्ये एनसीसी कॅडेट प्रवेश प्रक्रिया

इचलकरंजी, ता. २७ : 'डीकेएएससी' कॉलेजमध्ये ५६ महाराष्ट्र बटालियन, कोल्हापूर यांच्यामार्फत मराठी मीडियम हायस्कूल, नारायण मळा येथे महाविद्यालयाची नवीन एनसीसी कॅडेट प्रवेश प्रक्रिया झाली. १९ जागांसाठी झालेल्या या प्रवेश प्रक्रियेत महाविद्यालयातील २०० हून अधिक इच्छुक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

महाविद्यालयामध्ये ५६, महाराष्ट्र बटालियन अंतर्गत एनसीसी विभाग अनेक वर्षांपासून यशस्वीरीत्या कार्यरत आहे. या विभागाची या वर्षी १९ जागांसाठी प्रवेश प्रक्रिया घेतली. प्रक्रियेत महाविद्यालयातील २०० हून अधिक इच्छुक विद्यार्थी सहभागी झाले. यावेळी शारीरिक चाचणी (रनिंग, सीटअप्स, पुलअप्स, पुशअप्स), लेखी परीक्षा आणि मुलाखत अशा टप्प्यांमधून ही प्रवेश प्रक्रिया झाली. लवकरच बटालियनकडून या प्रवेश प्रक्रियेचा निकाल जाहीर होणार आहे. सुरुवातीला प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी लेफ्टनंट कर्नल निखिल सक्सेना यांचे व सर्व एनसीसी अधिकाऱ्यांचे स्वागत केले. यावेळी ५६, महाराष्ट्र बटालियनचे सुभेदार मेजर रवींद्र चव्हाण, सुभेदार भगीरथ, सुभेदार सुमंत यादव, सुभेदार माने, हवालदार संदीप गायकवाड, हवालदार रशविंदर सिंग उपस्थित होते. प्रा. विनायक भोई यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी कॅडेट्सनी प्रवेश प्रक्रियेचे नियोजन केले होते.



इचलकरंजी : मराठी मीडियम हायस्कूल, नारायण मळा येथे 'डीकेएएससी' कॉलेजची एनसीसी कॅडेट प्रवेश प्रक्रिया झाली.

28/08/25

28/08/25

सकाळ गुरुवार, २८ ऑगस्ट २०२५



**इचलकरंजी** : येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंची कराटे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. यानिमित्त त्यांचा महाविद्यालयात सत्कार केला.

# डीकेएएससीच्या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय कराटेत यश

इचलकरंजी, ता. २७ : येथील डीकेएएससी कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत यश मिळविले. इचलकरंजी महापालिका शालेय शासकीय कराटे स्पर्धा राजीव गांधी भवन येथे पार पडल्या.

स्पर्धेत महाविद्यालयातील १९ वर्षांखालील गटात हर्षदा पुजारी व श्रेया लड्डे यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली, तर १७ वर्षांखालील मुलींच्या गटात ज्ञानदा पुजारी व १७ वर्षांखालील मुलांच्या गटात ऋषिकेश धारवट यांचीही विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. सर्व यशस्वी खेळाडूंचा प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. खाडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी ज्युनिअर विभागप्रमुख प्रा. शशिकांत कुंभार उपस्थित होते. खेळाडूंना क्रीडा संचालक विनायक भोई व प्रा. मुजफ्फर लगीवाले यांचे मार्गदर्शन लाभले.

28/08/25

28/08/25

सकाळ, बुधवार, ३ सप्टेंबर २०२५



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाच्या धनुर्विद्या खेळाडूंनी जिल्हास्तरावरील शासकीय धनुर्विद्या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत पदके पटकावली.

# 'डीकेएएससी'च्या खेळाडूंचे धनुर्विद्या स्पर्धेत यश

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता.२ : येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या धनुर्विद्या खेळाडूंनी जिल्हास्तरावरील शासकीय धनुर्विद्या स्पर्धेत अचूक नेम साधत आपली छाप उमटवली. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कोल्हापूर व इचलकरंजी महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने डीकेटीई हायस्कूल नारायण मळा येथे झालेल्या या स्पर्धेत खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत पदके पटकावली.

स्पर्धेत १७ वर्षांखालील (मुले) रिकर्व प्रकारात अमेय कदम, १९ वर्षांखालील (मुले) कंपाऊंड प्रकारात आर्यन सपकाळ, १९ वर्षांखालील (मुली) रिकर्व प्रकारात अंशिका



वाईकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर १९ वर्षांखालील (मुले) रिकर्व प्रकारात प्रशांत तुरंबेकर याने द्वितीय क्रमांक मिळवत महाविद्यालयाचा लौकिक केला. या खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. खेळाडूंना क्रीडा संचालक प्रा. विनायक भोई व प्रा. मुजफ्फर लगीवाले यांचे मार्गदर्शन लाभले.

दक्षिण महाराष्ट्र केसरी ३ सप्टेंबर २०२५/११

# डी.के.ए.एस.सी महाविद्यालयाच्या आर्चरी खेळाडूंचा अचूक निशाणा

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी** : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कोल्हापूर व इचलकरंजी महानगरपालिका आयोजित शासकीय आर्चरी क्रीडा स्पर्धा डी के टी ई हायस्कूल नारायण मळा या ठिकाणी उत्साह पूर्ण वातावरणामध्ये संपन्न झाल्या.

या झालेल्या स्पर्धेमध्ये डी के ए एस सी महाविद्यालयाच्या आर्चरी खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत अचूक नेम साधला. यामध्ये १७ वर्षाखालील (मुले) रिकर्व अमेय कदम (प्रथम क्रमांक). १९ वर्षाखालील (मुले) कंपाऊंड आर्यन सपकाळ (प्रथम क्रमांक). १९ वर्षाखालील (मुली) – रिकर्व अंशिका वाईकर (प्रथम क्रमांक).१९ वर्षाखालील (मुले) रिकर्व प्रशांत तुरंबेकर (द्वितीय क्रमांक) यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.



इचलकरंजी : आर्चरी क्रीडा स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंचा सन्मान करताना प्राचार्य एस. के. खाडे.

खेळाडूंच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस के खाडे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. खेळाडूंना महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा.विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाचा प्राध्यापक स्टाफ, प्रशासकीय स्टाफ व विद्यार्थी विद्यार्थिनींनी खेळाडूंना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

सकाळ सोमवार, ८ सप्टेंबर २०२५

# जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालयाचे यश

इचलकरंजी, ता. ७ : जिल्हास्तरीय शासकीय बॅडमिंटन स्पर्धेत येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या बॅडमिंटन संघाने उत्कृष्ट कामगिरी केली. स्पर्धेत १९ वर्षांखालील गटामध्ये प्रथम क्रमांक मिळवला.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कोल्हापूर व इचलकरंजी महानगरपालिका आयोजित या स्पर्धा व्यंकटराव हायस्कूल व ज्युनिर कॉलेज येथे झाल्या. महाविद्यालयाच्या संघाने पहिल्या दोन सामन्यांत व्यंकटराव ज्युनिर कॉलेज व डीकेटीई कॉलेज यांच्यावर विजय मिळवला. अंतिम सामन्यात तात्यासाहेब मुसळे कॉलेजचा सरळ दोन गेममध्ये पराभव करत स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. संघातील खेळाडू अपूर्व दवडते, मोहित कांबळे, सुभान सनदी, प्रथमेश कोष्टी व आयुष बुचडे यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे या संघाची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. खेळाडूंच्या या यशाबद्दल प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी खेळाडूंचा सत्कार केला. खेळाडूंना क्रीडा संचालक प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले यांचे मार्गदर्शन लाभले.



**इचलकरंजी :** बॅडमिंटन स्पर्धेतील प्रथम क्रमांक डीकेएएससी महाविद्यालयाच्या यशस्वी खेळाडूंचा प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या हस्ते सत्कार झाला.

08/09/25

08/09/25

दक्षिण महाराष्ट्र केसरी
११ सप्टेंबर २०२५/

# कदम महाविद्यालयाच्यावतीने भाग्यश्री रायकरचा सत्कार

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाची विद्यार्थिनी भाग्यश्री रामचंद्र रायकर हिने हिंदी विषयात शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्तायादीत स्थान मिळवले आहे. या यशाबद्दल तिचा प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

दरम्यान, महाविद्यालयातील हिंदी पदव्युत्तर विभागात अतिथी व्याख्याता म्हणून कार्यरत असलेले डॉ. विठ्ठल नाईक यांना मुंबई हिंदी प्रचार सभेचा शिक्षण क्षेत्रातील पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यांचाही गौरव प्राचार्य डॉ. खाडे यांच्याहस्ते केला.

या प्रसंगी प्रा. विजय पाटील, प्रा. डी. ए. यादव, डॉ. सुभाष जाधव, प्रा. निलेश जाधव, प्रा. अपर्णा कांबळे उपस्थित होते.

11/09/25

11/09/25

सकाळ
शुक्रवार, १२ सप्टेंबर २०२५



इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता यादीत स्थान पटकावल्याबद्दल भाग्यश्री रायकर हिचा प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या हस्ते सत्कार केला.

## भाग्यश्री रायकरचा सत्कार

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी महाविद्यालयाची विद्यार्थिनी भाग्यश्री रामचंद्र रायकर हिने हिंदी विषयात शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. यशाबद्दल तिचा प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. खाडे यांच्या हस्ते अभिनंदनपत्र देऊन सत्कार केला. तसेच हिंदी पदव्युत्तर विभागातील अतिथी व्याख्याता प्रा. डॉ. विठ्ठल नाईक यांना मुंबई हिंदी प्रचार सभेचा शिक्षण क्षेत्रातील पुरस्कार प्राप्त झाला. त्यांचाही सन्मान केला. प्रा. विजय पाटील, प्रा. डी. ए. यादव, मराठी विभाग प्रमुख प्रो. डॉ. सुभाष जाधव, हिंदी विभाग प्रमुख प्रा. निलेश जाधव, प्रा. अपर्णा कांबळे आदी उपस्थित होते.

12/09/25

12/09/25

लोकमत सोमवार, दि. १५ सप्टेंबर २०२५ |

# विवेकानंद महाविद्यालयाला सर्वसाधारण विजेतेपद

## जिल्हास्तरीय युवा महोत्सव : मिरजेत गुरुवारी मध्यवर्ती युवा महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज** : शिवाजी विद्यापीठाच्या ४५ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील सांघिक आणि वैयक्तिक स्पर्धेतील सर्वसाधारण विजेतेपद कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजने पटकाविले. जिल्ह्यातील ७९ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी महोत्सवात भाग घेतला होता. येथील शिवराज विद्या संकुलात हा महोत्सव पार पडला. विजेत्या संघांची गुरुवारी (दि. १८) मिरज येथे होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे.

**कलाप्रकार आणि गुणानुक्रमे पहिले ५ विजेते असे** : लोकनृत्य - डी.के.टी.ई. इचलकरंजी, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग, कोल्हापूर, दत्ताजीराव कदम महाविद्यालय इचलकरंजी, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगुड, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

**लोककला** - सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, न्यू कॉलेज कोल्हापूर, डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठानचे अभियांत्रिकी महाविद्यालय कोल्हापूर, शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज, डी. आर. माने कॉलेज कागल. एकांकिका - कॉमर्स कॉलेज कोल्हापूर, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

**प्रहसिका** - कॉमर्स कॉलेज कोल्हापूर, भारती विद्यापीठाचे इंजिनिअरिंग कोल्हापूर, कन्या महाविद्यालय जयसिंगपूर, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ.

**मूकनाट्य** - भारती विद्यापीठाचे इंजिनिअरिंग कोल्हापूर, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगुड, आण्णासाहेब डांगे महाविद्यालय हातकणंगले, दत्ताजीराव कदम महाविद्यालय इचलकरंजी, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

**पथनाट्य** : विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, कॉमर्स कॉलेज कोल्हापूर, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगुड, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, विजयसिंह यादव कॉलेज पेठवडगाव.

**समूहगीत** - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, कॉमर्स कॉलेज कोल्हापूर, राजाराम कॉलेज कोल्हापूर.

**वादविवाद** - शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, केआयटी कोल्हापूर, घाळी कॉलेज गडहिंग्लज, न्यू कॉलेज कोल्हापूर, यशवंतराव चव्हाण कॉलेज हलकर्णी (चंदगड), प्रश्नमंजूषा - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, डी. डी. सरकार कॉलेज कोल्हापूर, कॉलेज ऑफ नॉन कन्व्हेशनल वुमेन्स कॉलेज कोल्हापूर, घाळी कॉलेज गडहिंग्लज.

**एकपात्री अभिनय** - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, कॉलेज ऑफ नॉन कन्व्हेशनल वुमेन्स कॉलेज कोल्हापूर, कला महाविद्यालय गडहिंग्लज, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी.

**सुगम गायन** - देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज कोल्हापूर, भोगावती महाविद्यालय कुरूकली, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, चंद्रबाई-शांताप्पा शेंडुरे कॉलेज हुपरी, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ.

**वक्तृत्व मराठी** : डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, घाळी कॉलेज गडहिंग्लज, शिवराज कॉलेज गडहिंग्लज. वक्तृत्व हिंदी : विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर, जयवंत महाविद्यालय इचलकरंजी, दूधसाखर महाविद्यालय बिद्री, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, वक्तृत्व इंग्रजी - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, शिव-शाहू महाविद्यालय सरूड, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज कोल्हापूर.

15/09/25

15/09/25

सकाळ सोमवार, १५ सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद'चा डबल धमाका

## गडहिंग्लजला 'शिवराज'मध्ये जिल्हास्तरीय युवा महोत्सव

■ सकाळ वृत्तसेवा

**गडहिंग्लज, ता. १४ : शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि येथील शिवराज महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने ४५ वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव उत्साहात झाला. कोल्हापूरच्या विवेकानंद महाविद्यालयाने डबल धमाका केला. सांघिक व वैयक्तिक अशा दोन्ही गटांचे सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.**




**गडहिंग्लज** : शिवराज महाविद्यालयात झालेल्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात स्पर्धक विद्यार्थिनींनी कला सादर केली.
(आशपाक किल्लेदार : सकाळ छायाचित्रसेवा)

### एकांकिका

■ **देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.**

### लोकनृत्य

■ **दत्ताजीराव कदम टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे टेक्स्टाइल अँन्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट, इचलकरंजी, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोल्हापूर, दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.**

### वक्तृत्व इंग्रजी

■ **विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, शिव-शाहू महाविद्यालय सरूड, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर.**

दरम्यान, युवा महोत्सवात जिल्ह्यातील ७८ महाविद्यालयांचे १२८१ स्पर्धक विद्यार्थी सहभागी झाले होते. आपापल्या कला प्रकारात त्यांनी कलांचे सादरीकरण केले. प्रत्येक कला प्रकारातील पहिल्या पाच विजेत्यांची मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे. मिरज (ता. सांगली) येथील शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे कॉलेज येथे गुरुवारी (ता. १८) मध्यवर्ती युवा महोत्सव होणार आहे. कला प्रकारनिहाय अनुक्रमे विजेते असे...

**लोककला** - सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, दि न्यू कॉलेज, कोल्हापूर, डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर, शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज, डी. आर. माने आर्टस् अँन्ड कॉमर्स कॉलेज, कागल.

**प्रहसिका** - देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर, डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ.

**मूकनाट्य**- भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड, अण्णासाहेब डांगे आर्टस्, कॉमर्स कॉलेज हातकणंगले, दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

**पथनाट्य** विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड, सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, विजयसिंह यादव कॉलेज, पेठवडगाव.

**भारतीय समूहगीत** - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, राजाराम कॉलेज कोल्हापूर.

**वादविवाद** - शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, के.आय.टी.चे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, यशवंतराव चव्हाण कॉलेज हलकर्णी.

**प्रश्नमंजूषा**- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, डी. डी. शिंदे सरकार कॉलेज कोल्हापूर, कॉलेज ऑफ नॉन-कनव्हेन्सनल व्होकेशनल कोर्स फॉर वूमन कोल्हापूर, डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज.

**एकपात्री अभिनय**- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, कॉलेज ऑफ नॉन-कनव्हेन्सनल व्होकेशनल कोर्स फॉर वूमन कोल्हापूर, आर्टस्, कॉमर्स अँन्ड सायन्स महाविद्यालय गडहिंग्लज, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी.

**सुगम गायन**- देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, भोगावती महाविद्यालय कुरूकली, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, चंद्राबाई-शांताप्पा शेंडूरे कॉलेज हुपरी, सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ.

**वक्तृत्व मराठी**- डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, डॉ. घाळी कॉलेज गडहिंग्लज, शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज.

**वक्तृत्व हिंदी**- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, जयवंत महाविद्यालय इचलकरंजी, दूधसागर महाविद्यालय बिद्री, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर.

15/09/25

15/09/25

सकाळ सोमवार, १५ सप्टेंबर २०२५

# खेळामुळे घडते व्यक्तिमत्त्व सक्षम

## प्राचार्य साळुंखे : इचलकरंजीत एएससी कॉलेजमध्ये बॉक्सिंग स्पर्धा

■ **सकाळ वृत्तसेवा**



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये बॉक्सिंग स्पर्धेचे उद्‌घाटन प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे, सूर्यकांत शेटे उपस्थित होते.

इचलकरंजी, ता. १४ : 'खेळामुळे मन, मेंदू आणि मनगट मजबूत होते. तसेच खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व सक्षम होते. विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये सहभाग घेऊन खिलाडूवृत्ती जोपासायला हवी. खेळातून गवसलेली खिलाडूवृत्ती जगण्यातील यश-अपयश पचविण्याची ताकद देते,' असे प्रतिपादन स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी केले.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, इचलकरंजी महानगरपालिका आणि डीकेएएससी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित इचलकरंजी महापालिका शालेय जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेचे उद्‌घाटन प्राचार्य साळुंखे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिमखानाप्रमुख प्रा. लेफ्टनंट विनायक भोई यांनी स्पर्धेचे आयोजन केले आहे. यावेळी महानगरपालिकेचे क्रीडा अधिकारी सूर्यकांत शेटे, क्रीडा पर्यवेक्षक सचिन खोंद्रे उपस्थित होते. प्रा. विनायक भोई यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डी. ए. यादव, डॉ. एस. टी. इंगळे, गुरुदेव कार्यकर्ते प्रा. एम. एम. कांबळे, प्रा. व्ही. बी. पाटील, प्रा. अमित कुंडले, क्रीडा प्रशिक्षक सुहास पवळे उपस्थित होते. प्रा. रोहित शिंगे यांनी सूत्रसंचालन केले.